**निशाणी क्रमांक –३८.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – सलमान जिलान पठाण,

वय – ३१ वर्षे धंदा – व्यवसाय,

रा. हाडोळती, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे**

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २७३ अन्वये )

**०१.** मी आरोपींना ओळखतो. आज सर्व आरोपी न्यायालयात हजर आहेत. मी फिर्यादीस ओळखतो. पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्यासाठी दिनांक ०१.११.२०२३ रोजी बोलवले होते. मला घटनास्थळावर सकाळी १०.२० मिनीट ते ११.१५ वाजेपर्यंत बोलवले होते. घटनास्थळ विनायक गोरे यांच्या शेतीच्या बांधावर होते. घटनास्थळ फिर्यादी यांनी दाखवले. पंचनाम्यासाठी माझ्यासोबत गावातील शाहरूख हुसेन मुजावर हे होते. आमच्यासोबत अजून इतर एक ते दोन जन होते. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा माझ्या व दुसऱ्या पंचासमक्ष घटनास्थळावर केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र.३९** देण्यात येतो. घटनास्थळावर हरभरा पेरलेला दिसला.

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. ई. भुरकापल्ले**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी माझे शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे शेत मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे शेत हाडोळती ते जगळपूर रस्त्याला आहे. हे म्हणणे खरे आहे की, हाडोळती ते जगळपूर रस्त्याच्या पुढे पांदण रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या पांदण रस्त्याच्या पश्चिमेस फिर्यादीचे शेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती पांदण पुढे आरोपीच्या शेताला जाते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या शेताच्या चतुःसिमेमध्ये लगत फिर्यादीचे शेत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे शेत व आरोपीचे शेत यामध्ये १५०० फुट अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पूर्वेस आरोपीची जमिन आहे व पश्चिमेस नदी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दक्षिणेस बालीका भोंग व काशिबाई गोरे व मिराबाई हेंगणे यांचे शेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या

उत्तरेस आरोपीची जमिन आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील हरभरा पिकाचे ट्रॅक्टर गेल्याने नुकसान झालेले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा केला त्याच्या लगत कुठेही फिर्यादीची जमिन नाही तसेच फिर्यादीच्या जाण्या येण्याचा रस्ता नाही.

उलटतपास पूर्ण.

**फेरतपास** काही नाही.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.10.01 12:36:30 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

दिनांक –०१.१०.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.